पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc@mah.gov.in

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/१२८(८६३/२०२४ दिनांक - २२ /०८/२०२४

बीआरटी मार्गिकेमध्ये सद्यस्थितीत अनेक प्रकारची हलकी व जड अवजड वाहणे प्रवेश करत असुन सदर वाहनांमुळे बीआरटी मध्ये असणारी स्टील रेलिंग, बस स्टॉप अशा प्रकारच्या गोष्टींचे वारंवार नुकसान होवुन रस्त्याचे विद्रुपीकरण होत आहे. तसेच सदर वाहनांमुळे दिवसेंदिवस अपघातात वाढ होवुन जिवीत व वित्त हानी होत आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्या अर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे <u>अंतिम आदेश</u> निर्गमित करण्यात येत आहेत.

## <u>पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत</u>

**१. पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत असणाऱ्या बीआरटी मार्गिकेमध्ये बीआरटी बसेसखेरीज (उदा.फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, पिंपरी चिंचवड मनपाकडील देखभाल दुरस्ती पथकातील वाहने इ. वगळुन) इतर वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.**

तरी वरील प्रमाणे बीआरटी प्रवेश बंदीबाबत अंतिम अधिसुचना (नोटीफिकेशन) काढण्यात येत असुन नागरीकांनी बीआरटी मार्गिकेचा वापर न करता इतर मार्गिकेचा वापर करावा.

सदर अधिसुचनेची अमंलबजावणी २२ / ०८/२०२४ पासुन करण्यात येत आहे.

२२/०८

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी वाहतुक विभाग
४) कार्यकारी अधिकारी, बीआरटीएस विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner